# स्त्री जीवनाचा इतिहास
# [ वैदिक कालखंड ते मध्ययुगीन कालखंड ]

शोधपत्र

* प्रा. जयश्री महाजन

वेदकाळात स्त्रीचा दर्जा हा पुरुषाच्या बरोबरीचा होता असे मानले जाते. त्याकाळात स्त्रियांना सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्वातंत्र होते. धर्म, वाङःमय आणि बुध्दी या तिन्ही कसोटीवर स्त्री आणि पुरुष हे एकाच योग्यतेचे मानले जात. स्त्रिया अनेक कलांमध्ये नैपूण्य मिळवित तसेच आर्थिक कार्यही करीत. संगिताला विशेष महत्वाचे स्थान होते. गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिवण, पठण, वाचन इत्यादी कला स्त्रियांसाठी आवश्यक मानल्या जात. वेदकाळात स्त्रियांना आपले अध्यात्मिक आणि बौध्दिक जीवन समृध्द करण्याचा अधिकार होता.ज्ञान-प्राप्तीची सर्व साधने त्यांना मोकळी असत. हारीताच्या मतानुसार, त्याकाळी स्त्रियांमध्ये शैक्षणिक दृष्टिकोनातून दोन प्रकार केले होते. एक ब्रह्मवादिनी तर दुसरा सघोद्वाहा. त्यापैकी ब्रह्मवादिनी स्त्रीया ज्ञान ग्रहण करुन साधना करीत. तसेच त्या आजन्म ब्रह्मचारी व्रताची पालन करीत. उपनयन संस्कार झाल्यानंतर ब्रह्मवादिनींना यज्ञास आहुती देणे, वेदाध्ययन करणे, ब्राह्मविद्या शिकणे या गोष्टींची अनुमती मिळत असे. वैदिक वाङःमयातून अध्ययनाच्या बाबतीत स्त्रिया आणि पुरुष असा भेदभाव केलेला आढळून येत नाही असे सरोजीनी बाबर आपल्या लिखाणात म्हणतात. अथर्ववेदात ब्रह्मचर्य व वेदाध्ययन यांच्या सहाय्याने मुलगी अनुरुप पती प्राप्त करुन घेत असल्याचा महत्वपूर्ण उल्लेख आहे.

ऋग्वेदातील अनेक ऋचा स्त्री-स्वातंत्र्याच्या साक्ष देणाऱ्या आहेत. त्यात स्त्री ही उपेक्षीत घटक नाही. तिला समाजात, कुटूंबात मान होता. तिच्या गुणवत्तेचा आदर केला जात होता. तिला व्यवसाय निवडीच स्वातंत्र होत. (ऋपग्वेद १०, २७, १२) या ऋचेत म्हटल्याप्रमाणे विवाहाच्या बाबतीत स्त्रीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र दिले जात असे. कन्या आपपले वर पसंत करीत व वडिलांची संमती आवश्यक असे. (ऋग्वेद ३.५२, ३, ६२.८) तसेच ऋग्वेदकाळात स्त्रियांनी विवाह केलाच पाहिजे अशी सक्ती त्यांच्यावर नव्हती. काही अविवाहीत स्त्रीया आमरण पितृगृही राहील्याची उदाहरणे ऋग्वेदात आहेत. बालविवाहाची प्रथा त्यावेळी नव्हती. सर्वसाधारणपणे १६ हे वय विवाहयोग्य मानले जाई. धनिक, ग्रामप्रमुख, योध्ये, राजे इत्यादींमध्ये बहुपत्नीत्वाची प्रथा आढळून येई. तरी समाजात एकविवाह पध्दती आदर्श मानली जाई. दमयंतीच्या कथेवरुन लक्षात येते की, त्या काळी पतीचा मृत्यू एवढे एकच कारण पुनर्विवाहास आवश्यक समजले जात नसे तर बरेच दिवस पतीचा पत्ता नसेल तर त्या स्त्रीला पुनर्विवाह करण्याची मोकळीक होती. यज्ञकर्मात पुरुषांच्या बरोबरीने तीला वाटा होता. पुरुषांप्रमाणेच उपनयन संस्कार झाल्यानंतर स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात होई. ब्रह्मवादिनी स्त्रियांनी त्याकाळी विशेष उल्लेखनीय प्रगीत केल्याचेही दिसून येते. वेदाध्ययनाबरोबरच ब्रह्मवादिनी स्त्रियांनी पूर्वमिमांसेचाही अभ्यास केल्याचे दिसून येते. पूर्वमिमासाशास्त्र हे वेदकालीन यज्ञयागाच्या विरुध्द दिशेने विचार करणारे शास्त्र होते. त्याकाळात स्त्रियांनी या शास्त्राचा अभ्यास करुन लेखनही केलेले आढळते. याज्ञवल्क्याची पत्नी मैत्रेही ही याच वर्गात मोडणारी होती. ऐहिक जीवनापेक्षा अध्यात्मिक जीवनाची ओढ तिला होती. मैत्रेयी ही आत्मज्ञानाविषयक जीज्ञासेबद्दल प्रसिध्द होती. अमरत्वाकडे नेणाऱ्या विचार प्रणालीसंबंधी तीला विशेष ओढ होती. ती याज्ञबल्क्याशी ज्ञात आणि अज्ञात विषयासंबंधी तासनतास वादविवाद करीत असल्याचे उल्लेख सापडतात. सरोजीनी बाबरांच्या मते, वेदातील अनेक सुक्ते स्त्रियांनी लिहिलेली असून लोपामुद्रा, अपाला, विश्ववारा, सिकता, नीवावरी, घोषा यांचा उल्लेख सापडतो. त्या म्हणतात, स्त्रियांच्या विविध क्षेत्रातील या श्रेष्ठ प्रतीच्या यशस्वी अशा दर्जाचे मूळ हे त्यावेळच्या शिक्षण पध्दतीत सापडते. स्त्रीया अगर पुरुष हा भेदभाव त्यावेळच्या शिक्षणाच्या दृष्टीने केला जात नसल्यामुळे त्या काळातील अनेक स्त्रियांनी शिक्षक, तत्वज्ञ, आणि वादविवाद कुशल म्हणून नाव मिळवलेले होते.

असे असले तरी उच्च प्रकारचे शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या कमी होती. सर्वसामान्य घरातील मुलींना गृहजीवनासंबंधीचे शिक्षण दिले जाई. त्यावेळच्या कुलीन, सुसंस्कृत, घरदांज आणि श्रीमंत घरण्यांमधून घरच्या घरी सर्व प्रकारचे शिक्षण दिले जाई. लेखन, वाचन, जमाखर्च याबाबतीतही त्यांना थोडे फार शिक्षण मिळे. शास्त्रांचा अभ्यास उच्चविर्णियांच्या मुलींना करता येत असे. कुलीन घराण्यातील मुलींना नृत्यकला, संगितकला, चित्रकला इत्यादी घरउपयोगी कलांचे शिक्षण दिले जाई. अध्यापनाचे कार्य करणाऱ्या स्त्रीयांना आचार्य म्हटले जाई. या स्त्रीया काही गुरुगृही शिक्षण घेत तर काही वडिलांकडून, भावाकडून शिक्षण घेत. राजघराण्यातील व घराण्याशी संबंधित असलेल्या स्त्रियांना

* एम. जे कॉलेज, जळगांव

शासनविषयक आणि युध्दकला-विषयक शिक्षण दिले जात असे. गार्गीने तर विद्वानाच्या सभेत स्थान मिळवण्याचे उल्लेख सापडतात. ती याज्ञवल्क्याशी ज्ञात आणि अज्ञात विषयासंबंधी तासन्तास विवाद करीत असे. विदेही नगराचा राजा जनक यांच्या राजसभेत तीने याज्ञवल्क्याला निरुत्तर केल्याचे दिसते. स्त्रीयांना त्याकाळी पुरुषांप्रमाणेच शिक्षणाच्या सर्व शाखांमधून प्रवेश मिळत असे व त्यात त्या पारंगत होत असत. सघोवधू प्रकारातील स्त्रीयांना विवाह आवश्यक होता. या स्त्रीया १६ वर्षे वयापर्यंत शिक्षण घेत असत. या शिक्षणात गृहस्थधर्मात पार पाडाव्या लागणाऱ्या कर्तव्यांचा समावेश होता. या स्त्रीयांना नैमत्तीक प्रार्थनेसाठी लागणाऱ्या वेदातील ऋचा पाठ कराव्या लागत. आ.ह. साळुंके यांच्यामते, वैदिक समाज हा पुरुष प्रधान संस्कृतीचा पुरस्कर्ता होता. त्यामुळे वैदिक काळातील स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे व गौरवाचे स्थान होते हे अऐतिहासीक आहे. त्यांच्या मते, वैदिक काळात तुलनात्मकदृष्ट्या स्त्रियांची स्थिती काही अंशी बरी होती. ऋग्वेदात मुलगाच व्हावा अशी उत्कट इच्छा वारंवार व्यक्त केल्याचे आढळते तर आपल्याला मुलगी व्हावी अशी इच्छा एकदाही व्यक्त केली गेली नाही. चरकाने पूत्रप्राप्तीसाठी पुत्सवंत हा संस्कार सांगितला आहे. नरहर कुरुंदकर म्हणतात, डॉ. आळतेकरांनी दाखवून दिले आहे की, इ.स. पूर्व १००० पावेतो उपनयन संस्कार फक्त ब्राह्मण कुळातच होत असे. सर्व ब्राह्मण कुळात उपनयन संस्कार सार्वत्रिक नव्हता. प्रथम उपनयन फक्त ब्राह्मणांच्या पैकी काही कुळात होई. नंतर उपनयन सर्व ब्राह्मणात सार्वत्रिक झाले. त्यामुळे आ.ह. साळुंके यांच्या मते, जर इ.स. पूर्व १००० पर्यंत फक्त विद्वान ब्राह्मणांच्या कुळातच उपनयन होत असेल तर, त्या आधीच्या काळात स्त्रियांचे उपनयन नियमितपणे होत होते, असे मानता येत नाही. स्त्रियांच्या उपनयनाचा विधी निःसंदिग्धपणे सांगणारा संपूर्ण इतिहासातील एकमेव शास्त्रधार असे ज्यांच्या बाबतीत म्हणता येईल व ज्यांच्या आधारे अनेक अभ्यासकांनी प्राचीन भारतीय स्त्रीचा दर्जा श्रेष्ठ असण्याची गुलाबी चित्रे रंगवली आहेत तो हरित स्त्रियांचे उपनयन कसे तरी उरकून घ्यावे, असे सांगत आहे. त्यांच्या मते, उपनयनाच्या अभावी शूद्रत्व येते या विचारातून स्त्रीच्या पोटी जन्म घेणाऱ्या पुरुषांना श्रेष्ठत्व मिळावे या हेतूने तिचे उपनयन केले जात असावे.

**सूत्र व स्मृति काळातील स्त्री जीवन** :हा कालखंड वैदिक वाङःमयाच्या कालानंतर सुरु होतो. जवळपास याच काळात गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृति व इतर धर्मशास्त्रे रचली गेली. हा काळ साधारणपणे इ.स. पूर्व ४०० ते इ.स. ४०० हा मानला जातो. रामायण व महाभारत ही प्राचीन महाकाव्ये व पुराणांचा कालखंडही साधारणपणे हाच मानला जातो. या काळात आरंभी कौटिक्याचे अर्थशास्त्र व त्यानंतर कात्सायनाचे कामसूत्र इत्यादी ग्रंथही लिहीले गेलेत. ब्राह्मण व उपनिषद काळात काही नविन कल्पना वैदिक वाङःमयात रुढ होत गेल्या व त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम स्त्रियांवर आला. याच काळात जटील स्वरुपाच्या कर्मकांडाचा उदय झाला. धार्मिक विधी व धर्मकृत्ये यासंबंधी कडक नियम करण्यात आले. वेद हे अपौरुषिय आहेत या कल्पनेला उजाळा मिळाला. वेदांना इश्वरीय रुप प्रदान केल्यामुळे वेदमंत्राचे पठन अत्यंत काळजीपूर्वक झाले पाहिजे असे बंधन घातले गेले. त्यासाठी खास शब्दोच्चारांचे शास्त्र तयार करण्यात आले. त्यामुळे आपोआपच वेदांचे अध्ययन करणे अवघड झाले. मुळातच कमीत कमी १२ वर्ष वेदांचे अध्ययन करणे आवश्यक असे. तसेच पुढे वेदांच्या जोडीला ब्राह्मण आणि उपनिषद या ग्रंथाची देखील भर पडली. यज्ञविधीतील जटिलता, कडक नियम यामुळे वैदाध्ययन करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी होत गेली. हारिताच्या लेखनातून लक्षात येते की, इ.स. पूर्व ५०० च्या सुमारास उपनयनानंतर गंभीरपणे वेदाध्ययनाला वाहून घेणाऱ्या ब्रह्मवादिनी स्त्रियांची संख्या कमी होती. ते म्हणतात, इसवीसनाच्या प्रारंभापर्यंत स्त्रियांचे उपनयन नियमितपणे होत होते. याच कालावधीत मुलींचे विवाहाचे वयही कमी करण्यात आले. सूत्र-स्मृतीच्या कालखंडात स्त्रीशिक्षणाविषयक दृष्टिकोन संकुचीत होत गेला. वेदकाळात मुलींचे उपनयन ८ व्या वर्षी होऊन त्यांना नंतर ७ ते ८ वर्ष शिक्षण घेता येत असे. एकंदरीत मुळची कृषीनिष्ठ संस्कृती व आर्यांची पशुपाल संस्कृती या दोन्ही संस्कृतीतील स्त्रीयांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत कनिष्ठ झाले. हळूहळू त्यांचे वैदिक उपनयन होणेही बंद झाले व स्त्री ही शेवटी शूद्रांच्या पंक्तीला जाऊन बसली. वेदकाळात स्त्रीला स्वयंवरपध्दती, गांधर्वविवाह करुन स्वतःची पसंती वा नापसंती व्यक्त करण्याचा अधिकार होता असे दिसते. परंतु हा अधिकार पुढे स्मृती व सूत्रकाळात हळूहळू कमी होत गेला. वेदमंत्रोच्चार करतांना एवढीशी जरी चूक झाली तरी पाठकाचा नाश करते अशी समजूत प्रचालित झाल्यामुळे स्त्रियांना वेदाध्ययनाला मनाई करण्यात आली. स्मृतिमध्ये ब्राह्मणांना विशेषाधिकार देऊन त्यांचे हितसंबंध जपलेले आढळतात. स्त्रियांना उपनयनाचा संस्कार नाकारुन त्यांना सूत्र-स्मृतीकाळात शुद्रांच्या बरोबरीने मानले गेले. शास्त्रकारांनी धर्माच्या नावाखाली स्त्रियांचे खच्चीकरण केलेले दिसते.

याज्ञवत्क्याचे काळात बालविवाह रुढ झाला. आणि स्त्रियांच्या बौध्दिक विकासाचे मार्गात अनेक अडथळे निर्माण झाले. सूत्रकाळात विधवेला पतीच्या संपत्तीचा वारसा मिळत नसे व मुलगा असल्यास बापाच्या संपत्तीचा हिस्सा मुलीला मागता येत नसे. याबाबत सरोजीनी बाबर म्हणतात, सूत्रग्रंथ तयार होत असतांना वैदिक धर्मावर महान संकटे कोसळू लागली. यज्ञाच्या अतिरेकामुळे समाजात अव्यवस्था माजली आणि वेदाधिकार नसल्यामुळे शूद्र वर्गात पराकाष्ठेचे असमाधान पसरले. त्यामुळे एक प्रकारची सामाजिक क्रांती झाली. शास्त्राध्ययनाने येणाऱ्या बौध्दिक प्रगल्भतेस त्या मुकल्या आणि अप्रबुध्द ठरल्या. स्मृती काळात स्त्री ही

बंधनात पडली. परंतु पुरुषांवर मात्र स्मृतिकारांनी फारशी बंधन घातलेली दिसत नाहीत. एक प्रकारे स्त्री आणि पुरुषांच्या बाबतीत दुटप्पी लैंगिक निती प्रस्थापित झाली. मुलींसाठी विवाह करणे बंधनकारक झाले. विवाहाचे वय कमी झाल्यामुळे मुलींचा विवाह हा वयाच्या आठव्या किंवा नवव्या वर्षीच होऊ लागला. त्यमुळे स्त्रियांचा बौध्दिक विकास खुंटला. शिक्षणाअभावी स्त्रियांची वृत्ती संकुचीत होत गेली. मुलींसाठी उपनयन करणे ही गोष्ट आवश्यक राहीली नाही. त्यामुळे संतती शूद्र म्हणून गणली जाऊ नये म्हणून नाममात्र उपनयन विधी स्त्रियांसाठी शिल्लक राहीला. पुढे स्मृतिकारांनी तो ही अधिकार काढून घेतल्याचे दिसते. स्त्रियांना वेदांचे अध्ययन करण्याचा अधिकारच नाही असे सूत्रकाळात मानले जाऊ लागले. स्त्रियांच्या धार्मिक कार्य करण्याच्या अधिकारावरही गदा आली. मुलींनी विवाह केलाच पाहिजे हा विचार या काळात मूळ धरु लागला. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात पुढे जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले. स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली. स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाणही कमी होत गेले. सूत्र काळात मुळातच स्त्रीशिक्षणाबाबत विचार बदलत गेले. मुलींनी लिहायला, वाचायला शिकणे ही बाब नंतर स्त्रीयांसाठी असभ्यपणाची मानली जाऊ लागली. ललित कलांचे शिक्षण घेणे कमी प्रतिचे मानले जाऊन त्यांचा वेगळा वर्ग मानला गेला. क्षत्रिय कुळातील स्त्रियांना मात्र शिक्षण दिले जात असे. ललित कलांचे शिक्षण क्षत्रिय मुली घेऊ शेकत होत्या. समाजात ब्राह्मण सर्वश्रेष्ठ मानले गेल्यामुळे ब्राह्मण मुलींना थोड्या प्रमाणात शिक्षण मिळू शकले. या काळात पाठशाळेतील शिक्षणाऐवजी गृहशास्त्राचे शिक्षण स्त्रियांसाठी आवश्यक ठरले. स्त्रियांसाठी सार्वजनिक जीवन त्याज्य झाले. वेदकाळासारखे त्या सूत्रकाळात सभा-संमेलनात हजर राहू शकत नव्ह्त्या. या काळात स्त्री शिक्षणाला उतरती कळा लागली असली तरी काही अपवादात्मक स्थितीत स्त्रियांनी तत्वज्ञानाचा अभ्यास केलेला दिसतो. याच काळात गार्गी आणि मैत्रेयी या ब्रह्मवादिनी होऊन गेल्याचे उल्लेख आहेत. या काळात हिंदू धर्म अधिकाधीक कर्मकांडाकडे झुकत गेल्याचे दिसते.

**पुराण काळातील स्त्रीजीवन :**या कालखंडात मुलींचे लग्न नवव्या किंवा दहाव्या वर्षी होऊ लागल्यामुळे त्या अशिक्षित राहू लागल्या. गृहकृत्यापलिकडे कोणतेही शिक्षण त्यांच्याकडे नव्हते. त्यामुळे विचारांची प्रगल्भता त्यांच्याकडे नव्हती. विचाराने त्या कमकुवत बनत गेल्या. परिणामी पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया कमी दर्जाच्या ठरल्या व मागसालेल्या राहिल्या. सरोजीनी बाबर म्हणतात, अगदी लहान वयात लग्न होणारी कन्या उपनयन संस्काराला आणि विद्याध्ययनाला पारखी झाली होती तरी विवाह हाच तिच्या बाबतीत जणू मौजीबंधनाचा सोपस्कार ठरला. पतिने शिक्षकाची भूमिका घेतली आणि इथे सासर हे तिचे गुरुकूल झाले. मात्र इथे बंधने फार आली. सुनेच्या हातून गुन्हा झाला तर सासू-सासरे रागावतच, पण पति देव क्षुल्यक चूकीवरुनही आपल्या पत्नीला मारुन काढत असे. हाडे मोडेपर्यंत होणारे त्यांचे हे मारणे अंगावर शहारे आणणारे ठरे. रामायण काळात पतीचे महत्व वाढत गेले. पतीच्या सुखातच आपले सुख हा विचार मूळ धरत गेलेला दिसतो. पतीची आज्ञा मानून पतीच्या अधिकारात राहणाऱ्या स्त्रिला पतीव्रता म्हटले जाई. नियोगाची पध्दतही या काळात बंद झालेली दिसते. इ.स. २०० नंतरच्या काळात विधवा विवाहालाही विरोध झालेला दिसतो. या संदर्भात गीता साने म्हणतात, भारतात वेगवेगळ्या काळी अनेक स्मृती प्रचलित होत्या. सर्वात जून्या मनुस्मृतीला इतर सर्व स्मृतींची मान्यता होती. मनुस्मृतीने स्त्रीचे दास्य अत्यंत स्पष्टपणे सांगितले आहे. भारतात परंपरा व न्याय व्यवस्था हा धर्मशास्त्राचा भाग असल्याने स्मृतीच्या आज्ञांचे परिपालन अत्यंत कठोरपणे करण्यात आलेले आहे. या स्मृतिकारांनी स्त्रीचे माणुसकीचे अधिकार काढून घेतले. तिच्याशी संपर्क ठेवणेही वर्ज्य ठरविले. आई, बहिण, मुलगी ह्यांच्याशी संपर्क ठेवणेही पापात जमा झाले. त्यांच्या मते ती ओढाळ, नाठाळ मादी मात्र आहे. झोप, रिकामपण, दागिण्याचे वेड, काम, क्रोध, वक्रता, द्रोह, दुराचार हे गूण स्त्रीला मनूने विश्वाच्या आरंभीच दिलेले आहेत. अश्या प्रकारे उत्तर वैदिक काळात स्त्रीयांना बंधनात जखडले गेले. तिच्यापुढे सीता-सावित्रीचा आदर्श ठेवला गेला. पतीच्या जीवनाशी एकरुप होणे व पतीच्या सुखात आपले सुख सोधणे हा आदर्श मानला गेला. स्वतःच्या अस्तित्वाची गळचेपीच या काळात केली गेलेले दिसते.

उच्चवर्णिय स्त्रियांना वगळता इतर स्त्रियांना शिक्षणाची दारे बंद झाली. विवाह विषयक बंधने वाढली. जीवनसाथी निवडण्याच्या स्वातंत्र्यावर बंधने आली. पूत्रप्राप्तीपूर्वी विवाह होऊ लागली. विधवा पूर्नविवाहावर बंदी घालण्यात आली. त्यातच बहुपत्नीत्वाची पध्दती आमलात येऊ लागल्याने स्त्रियांसमोर मोठे प्रश्न निर्माण झाले. घटस्फोटीता व परितक्ता स्त्रियांच्या दुःखांना सीमा नव्हती. स्त्री- स्वातंत्र्यावर इतकी बंधने आली की, स्त्रीचा विचार कुणी व्यक्ती म्हणून करत नव्हते. एखाद्या गुलामासारखे जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या पायात रुढीपरंपरेच्या बेड्या येऊन पडल्या. त्याचबरोबर भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. ग्रीक, शक, पार्शियन यांच्या आक्रमणामुळे ऐहिक वृत्तीकडे पाहण्याची वृत्ती बदलत गेली. पुनर्विवाह करुन स्त्रियांनी संसार-सुख उपभोगण्यापेक्षा सन्यस्तवृत्तीने जगावे हा विचार पुढे आला. त्यामुळे पुर्नविवाह मागे पडले. पूर्वीच्या काळी पडता पध्दती अस्तित्वात नव्हती. डॉ. ज्योती लांजेवार म्हणतात, कर्मठ ब्राह्मणांच्या कर्मकांडाला विटलेल्या असंख्या स्त्रिया, धार्मिक व व्यवहारीक बंधने झूगारुन बुध्दाच्या शिष्या झाल्या. सुरुवातीला तर गौतम बुध्दाने सुध्दा स्त्रियांना परिव्रज्या घेण्याची परवानगी दिली नव्हती. लांजेवार म्हणतात, ज्ञान घेण्याची परवानगी आणि

पुरुषाप्रमाणे आत्मज्ञान करुन घेण्याची संधी या दोन्ही गोष्टींना बुध्दाने मान्यता दिल्यामुळे स्त्रियांना त्यांचा दर्जा सुधारण्याची समाजात स्वतंत्रपणे वावरण्याची अमूल्य संधीच प्राप्त झाली.

बौध्दकाळात स्त्रियांना शिक्षणाबाबत थोडेफार स्वातंत्र मिळालेले दिसते. परंतु हे स्वातंत्रही क्षणभंगुरच ठरलेले दिसते. पुढे बौध्द धर्माला उतरती कळा लागली आणि परत स्त्री पारतंत्र्याच्या जोखड्यात जखडली गेली. स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्त्रीया कर्मकांडात अटकून श्रध्दाळू बनत गेल्या. सरोजीनी बाबर म्हणतात, रामायण महाभारताच्या किंवा पुराणाच्या नंतरचा बराचसा काळ असा गेला की, स्त्रियांच्या शिक्षणासंबंधीचा मागमूसही कोठे लागू नये. या दिर्घ काळामध्ये स्त्रियांचे शिक्षण ही बाबच मुळी कुणाच्या फारशी लक्षात आली नाही. त्याकाळी समाजात मोकळेपणाने वावरण्याचे स्वातंत्र नाहिशे झाले. गोषा पध्दत आली. सम्राट अकबराचा काळ वगळता मोगल काळात स्त्रीवरील बंधने वाढू लागली. राजघरण्यातील स्त्रियांचे अपवाद सोडले तर एकंदरीत सर्वसामान्य स्त्रीच्या शिक्षणाला आहोटीच लागली होते असे दिसते. पेशवेकाळात तर स्त्री जीवन अतिशय अगतिक झाल्याचे दिसते. वेदाध्ययन, धार्मिक संस्कार, ज्ञानापासून वंचित असलेल्या स्त्रीया बंदिस्त जीवन जगत होत्या. कर्मकांडात गुरफटल्या होत्या. याच काळात विजोड विवाहाचे प्रमाणही वाढलेले दिसते. खुद्द पेशव्यांचे विवाह याच पध्दतीने झाल्याचे उल्लेख आढळतात. सतीची चाल अस्तित्वात होती. या काळात विधवांची स्थिती अत्यंत दयनीय होती. विधवांचे केशवपन सर्रास होत होते. या संदर्भात छाया दातार म्हणतात, बालविवाह होत असल्याने स्त्रियांना शिक्षणाची फारशी संधी मिळत नसे. मात्र धर्माची पकड घट्ट होईल, अंधश्रध्दा बळकट होतील याची काळजी घेतली जाई. मुलीला गृहकृत्यदक्षतेचे शिक्षण मिळे. पेशवे, इतर ब्राह्मण व मराठे सरदार यांच्य स्त्रीया बहुत करुन साक्षर असत. तर कष्टकरी लोकांच्या बायका त्यांना त्यांच्या धंद्यात मदत करती. मध्यमवर्गीय स्त्रियांना तर अर्थार्जनासाठी बाहेर पडण्याची पंचाईत. अगदी शेवटी त्यांना वेश्याव्यवसायाला जवळ करण्या वचून गत्यंतर नसे. वेश्यावस्ती तर होतीच पण रखेली ठेवण्याची पध्दतही होती. शिक्षण नसल्याने स्त्रीला आर्थिक व्यवहारात भाग घेता येत नव्हता. राजकारण करता येत नव्हते. शुद्रवत मान्यत्यामुळे धर्माची ओळख नव्हती. धर्माचे नियम बनविण्यात भाग घेता येत नव्हती. आठव्या वर्षी लग्न झाल्यामुळे तिच्या दृष्टीला कुटूंबाबाहेर पाहण्याची कुवत नव्हती व ती कम्पनातील कोत्या व संकुचित बुध्दीची झाली होती. राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक कोणतेही अधिकार नसल्यामुळे दुःखी, लाचार, निराश सर्वस्वी पुरुषाधीन स्त्री संपूर्णतहा मिट्ट काळोखात होती. या नंतरच्या अकबराच्या काळात बादशहा अकबराने सुधारणावादी दृष्टीकोन स्विकारल्याचे दिसते. अकबराने सतीच्या चालीस विरधो केला. विवाह वयाच्या बाबतीत बंधन घातले. बालविवाह, वरदक्षिणा याला निर्बंध घालण्याचा प्रय़त्न केला. अकबराने सुधारणावादी दृष्टिकोनातून अनेक नियम घालून दिलेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याची परिणामकारक अंमलबजावणी झालेली दिसत नाही. याच काळात हिंदू आणि मुस्लीम दोन्ही समाजात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या स्त्रियाही आढळून येतात. चित्तोडची राणी कर्णावती, गोंडवनची राणी दुर्गावती, चांदबिबी, शाहजहानची जहाआरा बेगम, आहिल्याबाई, इत्यादी प्रसिध्द राज्यकर्त्या याकाळात होऊन गेल्या. परंतु या स्त्रीया अपवादभूत असून त्याकाळचे स्त्रीजीवन पुरुषावलंबी होते असे दिसून येते. त्याच पध्दतीने मराठे कालीन समाजातही काही कतृत्ववान मराठी स्त्रीया होऊन गेल्याचे इतिहासात उल्लेख आढळतात. त्यात जिजाबाई, राधाबाई, गोपिकाबाई, येसूबाई, ताराबाई, आनंदीबाई, आहिल्याबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा उल्लेख करता येतो. अशा पध्दतीची दुटप्पी निती समाजात स्त्रीयांसाठी अवलंबिली गेली. शिक्षणाअभावी बुध्दीची प्रगल्भता व विचारशक्तीचा कुंठित झालेली स्त्री स्वतःच स्वतःला पुरुषापेक्षा कनिष्ठ मानायला लागली. पुढील काळात विधवा विवाहाला प्रतिबंध, केशवपन, पडदा पध्दती, सतीची चाल, देवदासी पध्दती, पतिव्रताचे महात्म इत्यादी बाबी जाणीवपूर्वक निर्माण करुन तिचे अस्तित्वच पूर्णपणे संपविल्याचे दिसते. पुरुषांची आंकित दासी म्हणून स्त्रीचे रुप समाजात मान्य पावते. एकीकडे स्त्रीची होणारी पिछेहाट दिसते तर दुसरीकडे इतिहासात कतृत्ववान स्त्रियांचे उल्लेख आढळतात. रझीया सुलतान, चांदबिबी, जीजाई, लक्ष्मीबाई, अहिल्याबाई इत्यादी स्त्रीया समर्थपणे राज्यकारभारात भाग घेतांना दिसतात. संतवाङःमयात सुध्दा अश्या स्त्रियांचे उल्लेख आढळतात. अकबर, शिवाजी यासारख्या राजांचा दृष्टीकोन स्त्रियांच्या बाबतीत उदार आढळतो. परंतु सर्वसामान्य समाज मात्र स्त्रियांबाबत संकुचित दृष्टिकोन बाळगत असलेला दिसतो. या सर्वांचा अपरिहार्य परिणाम म्हणून मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीजीवन अतिशय हलाखीचे असलेले दिसते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. 'The position of women in Hindu Civilization' - डॉ. ए.एस. आळतेकर २. भारतीय स्त्री - (हिंगणे स्त्री शिक्षण संस्था) ३. स्त्री शिक्षणाची वाटचाल - डॉ. सरोजीनी बाबर ४. मनुस्मृती - नरहर कुरुंदकर ५. हिंदु संस्कृती आणि स्त्री - आ.ह. साळुंके ६. स्त्री जीवन विषयक काही प्रश्न - कमलाबाई टिळक ७. भारतातील थोर स्त्रीया - श्री. श.वा. दांडेकर ८. मराठी स्त्री (खंड दुसरा) - दु.का. संत ९. भारतीय स्त्री जीवन - गीता साने १०. सामाजिक आंदोलने - गुरुनाथ नाडगोंडे ११. भारतीय समाज आणि स्त्री - ज्योति लांजेवार १२. स्त्री विमुक्ती - छाया दातार